# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.

**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)**

smcphewtr@gmail.com


जा.क्र. साआअ/उद्धव/ जाक/ ८४८ — दिनांक :- १८/०२/२०२५

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
## सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय
## पाणी पुरवठा विभाग
## पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन

सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या उजनी ते सोलापूर दरम्यानची मुख्य पाईप लाईन लांबोटी पुलाजवळ नादुरुस्त झाल्याने मोठया प्रमाणात पाण्याची गळती होत आहे. सदरची गळती दुरस्ती कामाकरीता गुरुवार दि. 20/02/2025 रोजी सोलापूर महानगरपालिकेमार्फत काम हाती घेण्यात येणार आहे. गळती दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने उजनी येथून पाण्याचा उपसा होणार नाही.

उपरोक्त कामामुळे पाकणी जलशुध्दीकरण केंद्र येथून पाण्याचा उपसा कमी होणार असल्याने दि. 20/02/2025 रोजीचा शहरातील काही भागातील पाणी पुरवठा उशिरा, कमी वेळ, कमी दाबाने होईल व तसेच उजनी पाईप लाईनवरुन व शहर गावठाण भागातील पाणी पुरवठा 1 रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे.

तरी कृपया नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही नम्र विनंती आहे.

कळावे दि. 18/02/2025

प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

प्रति,

संपादक दैनिक ------------------------------

उपरोक्त प्रमाणे पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन आपले दि. 19/02/2025 रोजी प्रसिध्द होणाऱ्या अंकात बातमी स्वरुपात देणेस विनंती आहे.

कळावे. दि. 18/02/2025

प्र.सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

गेला. तो परत आला नाही. त्यास कोणीतरी फूस लावून पळून नेल्याची तक्रार एमआयडीसी पोलिसांत पालकांनी दिली. यावरून बीएनएस कलम १३७ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा नोंद

कलेक्शन, जुना कुंभारी नाका) असे मुलाचे नाव आहे. नवीन १४ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वा. बिस्किट आणायला जातो म्हणून घरातून बाहेर पडला. तो अद्याप घरी परतला नाही.

पाठलाग करून प्रयत्न करून अ विनयभंग दोघांविरूध्द पोलिसात गुन्हा ही ३० जानेवारी

# शेतकऱ्यांच्या विरोधामुळे लांबोटीत ४ दिवसांपासून गळती दुरुस्ती नाही

## पोलिसांच्या मदतीने २० फेब्रुवारीला दुरुस्ती करणार

**प्रतिनिधी** | सोलापूर

उजनी ते सोलापूर मुख्य जलवाहिनीला लांबोटी येथे लागलेल्या गळतीची दुरुस्ती २० फेब्रुवारी रोजी केली जाणार आहे. गावठाण भागातील पाणीपुरवठा एक दिवस पुढे जाणार आहे, अशी माहिती महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

शुक्रवारी लागलेल्या गळतीमुळे परिसरातील शेतात पाणी साचले. नुकसान भरपाईची मागणी करत शेतकऱ्यांनी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना विरोध करत दुरुस्ती करू दिली नाही. त्यामुळे दुरुस्तीला उशीर झाला. दरम्यान, लाखो लिटर पाणी वाया गेले. आता पोलिस बंदोबस्तात दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. त्यासाठी शटडाऊन घेतले जाणार आहे. गळती दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने उजनी येथून पाण्याचा उपसा होणार नाही. पाणीपुरवठा कमी दाबाने व उशिरा होणार आहे. तसेच एक दिवस पाणीपुरवठा पुढे जाणार आहे.